# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी, जि.ठाणे.

**नगररचना विभाग**

## द्वितीय जाहिर सूचना

भिवंडी निजामपूर महानगरपालिका क्षेत्राची सुधारीत विकास योजना ही विकास नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र.टीपीएस१२९९/३३१/सीआर४५/९९/युडी-१२,दि.३०/३/२००१ व सम निर्णय क्रमांक दि.८/७/२००३ अन्वये मंजूर झालेली असुन ती अनुक्रमे दिनांक १/५/२००१ व दि.१४/८/२००३ पासून अंमलात आलेली आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या विनंतीनुसार महानगरपालिकेने मा.महासभा ठराव क्र.२१७ दि.१९/०९/२०१६ अन्वये मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये क्लस्टर डेव्हलपमेंट तरतुद नव्याने समाविष्ट करण्यासाठी कार्यवाही सुरु करण्यास तसेच तज्ञ कंपनीकडून आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन घेण्यास देखील मान्यता दिली आहे.

त्यास अनुसरुन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये क्लस्टर डेव्हलपमेंट तरतूद अनुषंगाने आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन घेण्यासाठी पात्र कंपनीकडून मुल्यांकन व कालावधी याबाबतचे देकार अपेक्षिण्यात येत आहेत. अन्य महानगरपालिका क्षेत्रामध्ये आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेल्या कंपनीला प्राधान्य देण्यात येईल. तरी ही सूचना जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत इच्छुक कंपनीने त्यांचे देकार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय कार्यालय, ४ था मजला निम्नस्वाक्षरीधारक यांचेकडे कार्यालयीन वेळेमध्ये (सकाळी १०.०० ते सायं.५.४५ ) पर्यंत सादर करावे.

**(मा.आयुक्त सो. यांचे मंजूरीने)**

दिनांक :- १८/०१/२०१७
भिवंडी.

(अ.अ.शेख)
**सहाय्यक संचालक,नगररचना,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

37 A4- 22